


# । ऱ्हुमॅटॉलॉजी कशासाठी ? ।

**डॉ. श्रीकान्त वाघ**

ऱ्हुमॅटॉलॉजी म्हणजे संधिवाताचे शास्त्र. ऱ्हुम म्हणजे स्राव होणे किंवा पाझरणे. स्रावांमुळे सूज येऊन वेदना होते. शरीरातील सांधे आणि त्यांच्याशी संबंधित लिगामेन्ट्स, स्नायू, हाडे इत्यादींमुळे जी वेदना होते तिला इंग्रजी बोली भाषेत ऱ्हुमॅटिझम म्हणतात. यालाच

मराठीत आपण संधिवात म्हणतो. शरीरात वेगवेगळ्या हालचाली घडवून आणणाऱ्या वातदोषाची संकल्पना आयुर्वेदात आहे. हालचाल करताना किंवा न करताही सांधे अथवा त्यांच्या आजूबाजूला दुखले की त्याला संधिवात समजतात.

ऱ्हुमॅटॉलॉजी ही चिकित्सा शास्त्राची (Medicine) सुपरस्पेशालिटी विशेष शाखा आहे. यात संधिवात आणि त्या अनुषंगाने येणारे हाडे, मणके, स्नायू इत्यादींचे आजार येतात. ऱ्हुमॅटॉलॉजीतील बरेचसे आजार हे आंतरिक प्रतिकार शक्तीच्या (Autoimmune) दोषामुळे निर्माण होतात. रुतलेल्या काट्याभोवती येणारी सूज किंवा जंतूसंसर्गाने येणारा ताप, ही शरीराच्या प्रतिकाराची लक्षणे आहेत. शरीराबाहेरच्या गोष्टींचा प्रतिकार करणारी यंत्रणा शरीरात जेव्हा स्वत:च्या घटकांविरुद्ध वापरली जाऊ लागते, तेव्हा असे वेगवेगळे आजार निर्माण होतात. घरातली माणसे आपापसात भांडू लागली की जसा कुटुंबाचा विनाश होतो, तसेच हे आजार संपूर्ण शरीरभर पसरून शरीराचा नाश करतात. रक्तवाहिन्यांना सूज (Vasculitis), सिस्टेमिक लुपस, स्क्लेरोडर्मा इत्यादी एकाच वेळी अनेक शरीरयंत्रणा बिघडवणारे आजार याच ऱ्हुमॅटॉलॉजीत येतात.

संधिवात हा आजार नसून लक्षण आहे. ऱ्हुमॅटॉलॉजीत असे शंभराहून जास्त आजार येतात. ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट तज्ज्ञांना एमडीच्या साडेआठ वर्षांच्या कोर्सनंतर आणखी पुढे दोन वर्षे या आजाराचे विशेष प्रशिक्षण घ्यावे लागते. त्यामुळे या गूढ आजाराचे निदान आणि उपचार ते कुशलतेने करू शकतात. ऱ्हुमॅटॉलॉजीतील ऱ्हुमॅटॉइड आरथ्रायटिस (आमवात), संधिवात (Osteoarthritis), गाऊट, लुपस, स्क्लेरोडर्मा, ॲन्किलोकसिंग, स्पाँडिलायटिससारखे मणक्यांचे विकार अशा बहुतेक आजारांमध्ये त्वचारोग, मानसरोग, हृदयविकार, मूत्रपिंडाचे दोष, नेत्ररोग तसेच अन्य आजार संभवतात. यामुळे ऱ्हुमॅटॉलॉजिस्टना इतर तज्ज्ञांसोबत मोठ्या हॉस्पिटलमध्ये काम करावे लागते. या आजारांमध्ये नेमके निदान करणे आणि उपचारांची दिशा सुनिश्चित करण्याचे काम ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट करतात. मोठे हॉस्पिटल नसलेल्या क्लिनिकमध्ये इतर तज्ज्ञांची मदत मिळू शकत नाही. तसेच तपासण्यांचे रिपोर्टही विश्वासार्ह नसतात. त्यामुळे अशा ठिकाणी ऱ्हुमॅटॉलॉजीच्या रोग्यांना योग्य न्याय देता येत नाही. त्यामुळेच जगभरातले ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट मोठमोठ्या मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये काम करताना दिसून येतात.

## ऱ्हुमॅटॉलॉजीची निदान पद्धती

ऱ्हुमॅटॉलॉजीतल्या आजारांच्या बिनचूक निदानासाठी ऱ्हुमॅटॉलॉजिस्टच हवा. कॅनडातील एका सर्वेक्षणात असे आढळून आले की, इतर डॉक्टरांनी ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे पाठवलेल्या रुग्णांपैकी ५० टक्के रुग्णांचे निदानच केलेले नव्हते आणि उरलेल्या निम्म्या रुग्णांचे निदान ४० टक्के अयोग्य होते. त्यामुळे ज्या ज्या वेळी या रोगांच्या निदानाविषयी अनिश्चितता असेल, त्या त्या वेळी ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे गेलेले उत्तम.

ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट सामान्यत: आजाराचा इतिहास आणि

**डॉ. श्रीकान्त वाघ – ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट**
एम.बी.बी.एस. (मुंबई), एम.डी. (मेडिसिन), एम.एस्सी. ऱ्हुमॅटॉलॉजी (युके), बी.ए.एम.एस., एम.ए.एस्सी. (चिकित्सा), एम.ए. (संस्कृत) एम.ए. (संगीत)
**तेजस अपार्टमेंट्स, १०७८ शुक्रवार पेठ, टिळक रस्ता, हिराबाग, पुणे ४११ ००२.**
• फोन : (०२०) २४४७ ८९९३, ९७६३४ ०७२२९, ८४४६४ ०५०५०
• **Email :** sywagh@yahoo.co.in • **Web :** www.arthritis-india.com • **You Tube :** Dr. Shrikant Wagh

रुग्णपरीक्षेवरून रोगाचे निदान करतात. त्यानंतर अगदी मोजक्या आवश्यक चाचण्या केल्या जातात. गुडघ्याच्या संधिवातासाठी बहुतेक वेळा एक्स-रे ची जरूरी नसते. लहान मुले आणि तरुण स्त्रियांत गाऊट होत नसल्याने त्यांचे युरिक ॲसिड तपासावे लागत नाही. एएसओ, ऱ्हुमॅटॉइड फॅक्टर अशा तपासण्याही अनेकदा अनावश्यक ठरतात. एएनएसारख्या चाचण्यांचा रिपोर्टचा अर्थही बऱ्याच डॉक्टरांना कळत नसतो. विदेशात इन्शुरन्स कंपन्यांमुळे अनावश्यक तपासण्यांच्या खर्चाविषयी बरीच जागरूकता असते. आपल्याकडेही परिस्थिती हळूहळू सुधारेल. अयोग्य निदानामुळे उपचारही चुकीचे होतात. केवळ रक्तात ऱ्हुमॅटॉइड फॅक्टर सापडला म्हणून ऱ्हुमॅटॉइड आमवात नसतानाही कितीतरी पेशंट लेफ्लुनामाइडसारखे विषारी औषध घेताना दिसतात. अशावेळी ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट असेल तर औषधांचा धोका आणि खर्च निश्चित टाळता येतो.ऱ्हुमॅटॉइड तसेच सोरायसिसचा संधिवात, लुपसचा मूत्रपिंड विकार, ॲन्किलोसिंग स्पाँडिलायटिस अशा बहुतेक महत्त्वाच्या आजारांमध्ये हल्ली क्रियाशीलता परिमाण (Activity Index) मोजतात. मधुमेहात रक्तातील साखर तपासतात तसेच वेदनेलाही परिमाण असते. आजारामुळे झालेली शरीराची हानी मोजण्याची वेगळी परिमाणे (Damage Index) असतात.ऱ्हुमॅटॉलॉजिस्टना या परिमाणांचे विशेष प्रशिक्षण असते. आजार हा असा परिमाणात मोजल्यामुळे आजाराचे गांभीर्य समजते. तसेच उपचारांचे स्वरूप आणि त्यांचे यशापयश ठरवता येते.

कधी कधी आजाराचे योग्य निदान होऊन उपचार सुरू असताना आजार बळावत जातो. पेशंटच्या तक्रारी वाढत राहतात. सांधे वेडेवाकडे होतात किंवा अन्य अवयवांवर परिणाम होतो. आजाराचा उपद्रव आणि गांभीर्य ओळखून योग्य उपचार ठरविण्यासाठी अशा प्रसंगी ऱ्हुमॅटॉलॉजिस्टची मदत घेतलीच पाहिजे. या संदर्भातील अमेरिकन कॉलेज ऑफ ऱ्हुमॅटॉलॉजीची मार्गदर्शक तत्त्वे जिज्ञासूंनी अवश्य पहावीत. (www.rheumatology.org / publications/guidelines/refer) त्यानुसार ऱ्हुमॅटॉलॉजीच्या क्षेत्रात पुढील आजार येतात. (तक्ता पहा)

## ऱ्हुमॅटॉलॉजिस्टची उपचारपद्धती

संधिवात असलेल्या सर्व आजारांमध्ये निदानासाठी तसेच आजाराच्या तीव्रतेचा अंदाज घेण्यासाठी आणि

## ऱ्हुमॅटॉलॉजीचे आजार

### १. सुजेचे संधिवात (आमवात)

यात ऱ्हुमॅटॉइड तसेच सोरायसिस, संग्रहणीजन्य (Colitis), रिॲक्टिव्ह, सेप्टिक (जंतुबाधाजन्य) संधिवात आणि ॲन्किलोसिंग स्पाँडिलायटिस हे येतात. या सर्व आजारांमध्ये सांधे सुजलेले असतात (बहुधा एकापेक्षा जास्त). सक ाळी अर्ध्या तासापेक्षा जास्त काळ कडकपणा राहतो आणि हालचालीने सांधे सैल होतात. अचानक सांधा सुजलेला (Aute Monoarthritis) रोगीही ऱ्हुमॅटॉजिस्टकडे जायला हवा. ४५ पेक्षा कमी वयाच्या रोग्यांमध्ये तीन महिन्यांपेक्षा

जास्त काळ चालणारी कंबरदुखी ॲन्किलोसिंग स्पाँडिलायटिसमुळे असू शकते.

२. लुपस, मायोसायटिस (स्नायूंची सूज-दुखणे आणि दुर्बलता) इत्यादी आजार (Connective Tissue Diseases)

३. वेगवेगळ्या प्रकारची रक्तवाहिन्यांची सूज (Vasculitis)

४. संधिवात (Osteoarthritis), तसेच मणक्यांचे स्पाँडिलोसिस.

५. हाडांचा विरळपणा (Osteoporsis) आणि इतर काही आजार.

६. गाऊ ट-युरिक ॲसिड आणि अन्य स्फटिकजन्य संधिवात.

७. टेनिस एल्बोसारखे आजार (Soft Tissue Theumatism)

८. मुलांचे संधिवात (भारतात पेडियाट्रिक ऱ्हुमॅटॉजिस्ट बोटांवर मोजता येण्याइतकेच)

९. वारंवार होणारे गर्भपात, तसेच गर्भारपणातील ऱ्हुमॅटिक आजार.

१०. याखेरीज निदान न झालेले एकापेक्षा जास्त शरीरयंत्रणांचे (Multi-system) आजार आणि अज्ञात कारणांुळे येणारा ज्वर

उपद्रव ओळखण्यासाठी ऱ्हुमॅटॉलॉजिस्टच पाहिजे. कधी–कधी निदान योग्य असूनही आजार आटोक्यात येत नाही. कधी–कधी बराच काळ शांत असलेला आजार अचानक उफाळून येतो. स्टिरॉइड्स, मेथोट्रेक्सेट, लेफ्लुनमाइड आणि नव्या जैविक औषधांचा वापर ऱ्हुमॅटॉलॉजिस्टच योग्य प्रकारे करू शकतात. या औषधांची उपचारपद्धती म्हणजे विस्तवाशी खेळच. आजार बळावला तर औषधांची मात्रा वाढवणे किंवा दुसरे जादा औषध देणे, आजार आटोक्यात आल्यावर मात्रा कमी करणे, विषारी उपद्रव वेळेवर ओळखणे व त्याचे नियंत्रण करणे अशी ही किचकट गुंतागुंतीची चिकित्सा आहे. एका दिवसात चालवण्याचे जादूसारखे काम करणारी नवी जैविक औषधे महागही असतात. त्यामुळे मेडिकल सुपरस्पेशालिस्ट ही परिस्थिती योग्य प्रकारे हाताळू शकतात. इतर स्पेशालिस्टपेक्षा ऱ्हुमॅटॉलॉजिस्टच्या उपचारांनी यश मिळण्याची शक्यता नेहमीच अधिक असते.

आमवात तसेच इतर आजारात त्वरेने निर्णय घेऊन अचूक उपचार महत्त्वाचे असतात. ऱ्हुमॅटॉइड संधिवातात उपचारांसाठी तीनेक महिन्यांचा उशीर झाला, तरी कधीही न भरून येणारी हानी होऊ शकते. त्यामुळे असे रोगी लवकरात लवकर ऱ्हुमॅटॉलॉजिस्टपर्यंत पोचणे अत्यावश्यक आहे. दुर्दैवाने ठिकठिकाणी फिरून अखेरचा उपाय म्हणून लोक ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे जातात. तेव्हा सुरुवातीच्या उपचारांची सुवर्णसंधी निघून गेलेली असते.

ऱ्हुमॅटॉलॉजीतील बहुतेक आजार दीर्घकाळ चालणारे असतात. त्यामुळे औषधांखेरीज इतरही बरेच उपचार करावे लागतात. विशेषत: रुग्णाचे मनोबल टिकविणे फारच महत्त्वाचे असते. मोठ्या रुग्णालयांमध्ये इतरही सुपरस्पेशालिस्ट असतात. त्या–त्या रोगानुसार त्यांचीही मदत घेणे क्रमप्राप्त असते. अशा परिस्थितीत ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट हा सूत्रधाराची भूमिका बजावत असतो. हल्ली ऱ्हुमॅटॉलॉजिस्टना सांध्यामधल्या तसेच इतर इंजेक्शनचे प्रशिक्षण असतेच. हळूहळू ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट आर्थोस्कोपी तसेच सांध्याच्या सोनोग्राफीपर्यंत पोहोचू लागले आहेत.

ऱ्हुमॅटॉलॉजीतील बहुतेक सर्व आजार हे एकंदरच गंभीर स्वरूपाचे असतात. सिस्टेमिक लुपसला तर ग्रीक पुराणातील हायड्रा राक्षसाची उपमा देतात. या राक्षसाला अनेक मुंडकी असतात. त्यातले एखादे उडवले तर तेथे आणखी तीन–चार मुंडकी उगवत. हे आजार म्हणजे आपल्याकडील रावणच. त्यांना नियंत्रणात आणण्यासाठी ऱ्हुमॅटॉलॉजीचा रामबाणच पाहिजे.

## ऱ्हुमॅटॉलॉजीची औषधे

ॲलोपथीच्या औषधांच्या विशेषत: वेदनाशामक आणि स्टिरॉइड्सच्या दुष्परिणामांविषयी बहुतेकांना भीती वाटते. डॉक्टर काही आपल्या पेशंटला विष देत नसतात. ऱ्हुमॅटॉलॉजिस्टच्या उपचारांमध्ये स्टिरॉईड्सचा डोस कमीत कमी राखला जातो आणि वेदनाशामक औषधेही गरजेपुरतीच वापरली जातात. औषधांचे दुष्परिणाम हे सामान्यत: रस्त्यावरून चालताना होणाऱ्या अपघातांसारखे असतात. अपघात होईल म्हणून कोणी रस्त्याने जायचे टाळत नाही. तसेच या औषधांविषयी आहे. आपण वापरीत असलेल्या औषधांच्या दुष्परिणामांची परिपूर्ण माहिती ऱ्हुमॅटॉलॉजिस्टना असते. म्हणूनच महिना–दीड महिन्याने पुन:पुन्हा रक्तचाचण्या केल्या जातात आणि दुष्परिणामांचा आधीच अंदाज घेतला जातो. सामान्यत: दुष्परिणाम करणारे औषध बंद केले की शरीरयंत्रणा पुन्हा मूळ पदावर येते. अशा परिस्थितीत ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट पर्यायी औषधांचा वापर करतात. या गंभीर आजारांमुळे निर्माण होऊ शकणारे कायमचे दोष आणि व्यंग टाळण्यासाठी औषधांचा थोडासा धोका पत्करलाच पाहिजे.

## ऱ्हुमॅटॉलॉजिस्टचा खर्च

आयर्लंडमधील एक ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट दिवसाकाठी दहा पेशंट तपासतो आणि त्यांची अपॉइंटमेंट सव्वा वर्षाने मिळते. आपल्या भारतात दिवसाकाठी शंभरएक पेशंट तपासणारे काही ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट आहेत. आपल्याकडे अर्ध्या तासाच्या चाचणीसाठी अडीच हजार रुपये फी घेणारे ऱ्हुमॅटॉलॉजिस्टही आहेत आणि ती देणारे पेशंटही आहेत. आपल्या पुण्यातील फी या मानाने फारच कमी आहे. ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे हार्ट स्पेशालिस्टची ॲन्जिओग्राफी आणि पोटाच्या तज्ज्ञांसारखी एन्डोस्कोपीची आयुधे नसतात. तरीही ऱ्हुमॅटॉलॉजिस्टच्या विशेष प्रशिक्षणामुळे, रुग्णाचा इतिहास आणि परीक्षण यातून मोजक्याच चाचण्या करून ते पेशंटचा वेळ आणि पैसा वाचवू शकतात. लखनौच्या एका सर्वेक्षणात एएनए ही महागणी चाचणी अन्य डॉक्टर मंडळींनी ९०% वेळा विनाकारण केली, असे लक्षात आले. योग्य वेळी केलेल्या अत्यावश्यक चाचण्यांमुळे

भविष्यकाळातील बराचसा खर्च वाचतो. शिवाय ऱ्हुमॅटॉलॉजिस्टच्या उपचारांमुळे आजार लवकर आणि योग्य पद्धतीने नियंत्रणात येतात, तो फायदा वेगळाच!

## ऱ्हुमॅटॉलॉजिस्टची कमतरता

एकशे दहा कोटींच्या भारत देशात सध्या जेमतेम ३०० ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट आहेत. म्हणजे सुमारे ३५ लाख लोकांसाठी फक्त एक. तीस टक्के लोकांना कोणत्या ना कोणत्या प्रकारचा संधिवात, तसेच मान किंवा कंबरदुखीचा विकार होतो. त्यातील जेमतेम निम्मेच पेशंट डॉक्टरकडे जातात. या गणितात एका ऱ्हुमॅटॉलॉजिस्टसाठी वर्षाला सुमारे साठ हजार किंवा रोज दोनशे पेशंट असे प्रमाण होते. तसेच या स्पेशालिस्टची माहिती नसल्यामुळे संधिवाताचे बरेचसे रोगी ऑर्थोपेडिक सर्जनकडे जाताना दिसतात. सर्जनची विचारसरणी ऑपरेशनच्या अंगाने चालते. संधिवाताच्या रोग्यांमध्ये तपासणी वगैरेंसाठी बराच वेळ द्यावा लागतो. तेवढा वेळ अनेकदा सर्जन मंडळी देऊ शकत नाहीत. शिवाय लुपस, स्क्लेरोडर्मा, लेप्रसी, सारकॉइड, कॅन्सरसारख्या भयंकर आजारांमधील संधिवाताचे अचूक निदान सर्जनकडून सहसा अपेक्षित नसते. नव्याने निदान झालेल्या संधिवातात योग्य औषधोपचारांमुळे शस्त्रक्रियांचे प्रमाण कमी होऊ शकते. रोचेस्टरमधील एका सर्वेक्षणानुसार १९८५ नंतर औषधी उपचार पद्धतीच्या प्रगतीमुळे ऱ्हुमॅटॉइड संधिवातात सांधा बदलण्याच्या ऑपरेशनचे प्रमाण बरेच कमी झाले आहे.

## संधिवातासाठी इतर वैद्यक प्रणाली

संधिवात हा समाजात एक दुर्धर आजार मानला जातो. पूर्वी ॲलोपॅथीत योग्य औषधोपचार नसल्याने, तसेच अननुभवी डॉक्टरांमुळे बहुतेक रोग्यांचे सांधे वेडेवाकडे झाले. यामुळेच आयुर्वेद, होमिओपॅथी, नॅचरोपॅथी, मसाज, ॲक्युपंक्चर अशा वैद्यक प्रणालींचे उपचार लोकप्रिय आहेत. सुजेच्या संधिवातात उपयोगी पडेल अशा कोणत्याही आयुर्वेदिक अथवा होमिओपॅथिक औषधां–विषयीचे संशोधन आतापर्यंत सर्वमान्य जागतिक नियतकालिकात प्रकाशित झालेले नाही. तसे झाले असते तर सर्पगंधा, लाजाळू आणि सदाफुलीसारखी ती औषधे केव्हाच बाजारात आणली असती. वेदना कमी करण्यासाठी काही वनस्पतींचा उपयोग दिसत असला तरी सांध्यांमधील सुजेची प्रक्रिया थांबविण्याचे कार्य आतापर्यंत तरी सिद्ध झालेले नाही. अनेक एम.बी.बी.एस., एम.डी. डॉक्टरांनाही जेथे ऱ्हुमॅटॉलॉजीच्या आजाराचे योग्य निदान करता येत नाही तेथे इतर वैद्यकांच्या डॉक्टरांकडून तशी अपेक्षा ठेवणे योग्य नाही. आजाराचे निदान नीट झाले नाही तर योग्य उपचार कसे होणार? योग्य निदानास उशीर झाल्यामुळे रोग्याचा अमूल्य वेळ वाया जातो आणि सांध्यांचा नाश होतो. आयुर्वेदिक औषधे तसेच त्यातील पंचकर्मादि उपचार हल्ली स्वस्तही राहिले नाहीत. एखाद–दुसऱ्या पेशंटमध्ये गुण दिसला तर त्याची कारणे बरीच असू शकतात आणि तो सर्वसामान्य नियम होऊ शकत नाही. संधिवातात वापरल्या जाणाऱ्या वातविध्वंस, महायोगराजगुग्गुळ अशा औषधांत शिसे असते. शिशाच्या विषारी परिणामांबाबत आता बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. गुण दिसावा म्हणून आयुर्वेदिक औषधात स्टिरॉइड्स मिसळणारे वैद्यही आहेत. अशी औषधे प्रदीर्घ काळ घेत राहणेची अयोग्यच आहे.

हल्ली जगात सगळीकडे जाहिरातींचे युग आले आहे. जाहिरात वाचून टीव्ही विकत घेणे वेगळे आणि पोटात औषध घेणे वेगळे. अशा सवंग धंदेवाईक जाहिराती सामान्यतः आयुर्वेदादी उपचार पद्धतींच्याच दिसतात. त्यामुळे अशांपासून चार हात दूर राहिलेले बरे.

❖ ❖ ❖